## निशाणी २२ वरील आदेश

०१. अर्जदार क्र. १ ते १४ यांनी दिवाणी व्यवहार संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे त्यांची नावे वादी क्र. १९ ते ३२ म्हणुन दाव्यात सामील करण्यात यावी या करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा मौजे तांदुळवाडी ता. भोकरदन जि. जालना येथील (गायरान) शेत जमीन गट क्र. १०३, एकुण क्षेत्रफळ १२ हे. ४५ आर यापैकी प्रत्येकी १ हे. जमीन सन १९८१ पासुन वादी क्र. १ ते १८ यांच्या ताब्यात व वहितीत आहे. तसेच मौजे मंडप सिरसगाव ता. भोकरदन जि. जालना येथील शेत जमीन गट क्र. १७७, (गायरान) एकुण क्षेत्रफळ ४५ हे. ७८ आर यापैकी प्रत्येकी ३ एकर जमीन हि सन १९८१ पासुन अर्जदार क्र. १ ते १४ यांच्या ताब्यात व वहितीत आहे. तसेच मौजे मंडप सिरसगाव ता. भोकरदन जि. जालना येथील ग्रामसेवक आणि सरपंच ग्राम पंचायत कार्यालय मंडप सिरसगाव ता. भोकरदन जि जालना यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील करण्यात यावे. सदर अर्जदारांची नावे या प्रकरणात वादी क्र. १९ ते ३२ म्हणुन समाविष्ट करण्याकरीता व ग्राम सेवक व सरपंच मौजे मंडप सिरसगाव ता. भोकरदन यांची नावे प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करण्यात यावी याकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

०३. अर्जदारांचे पुढे असेही कथन आहे की, वादीने दावा दाखल केला त्यावेळेस ते कामानिमित्त बाहेरगावी गेल्याने न्यायालयात हजर राहु शकले नाहीत. त्यामुळे त्यांची नावे दाव्यात समाविष्ट करणे राहुन गेले आहे.

वादी क्र.१९ ते ३२ म्हणुन अर्जदारांना दाव्यात समाविष्ट केल्यास मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. करीता अर्ज मंजुर करण्यात यावा.

०४. सदर अर्जास प्रतिवादींनी तीव्र आक्षेप नोंदवुन असे म्हणणे मांडले आहे की, सदरचा अर्ज कायदयाने चालणारा नाही त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे.

०५. अर्जदार व त्यांचे वकील यांचा पुकारा करता गैरहजर. अर्जाकामी जिल्हा सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणणे हेच त्यांा युक्तीवाद म्हणुन गृहित धरण्यात यावा असे तोंडी सांगितले. परंतु अर्जदारांतर्फे अनेक तारखा कोणीही हजर नसल्याचे दिसुन येत आहे. सबब अर्ज गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता अर्जदारांचे अर्जातील कथन हाच त्यांचा युक्तीवाद असल्याचे गृहित धरण्यात येत आहे. दाव्याचे अवलोकन केले.

०६. सदरचा दावा मौजे तांदुळवाडी ता. भोकरदन जि. जालना येथील गायरान शेत जमीन गट क्र.१०३, एकुण क्षेत्र १२ हे. ४५ आर पैकी वादी क्र.१ ते १८ यांच्या कब्जे वहिवाटीत प्रत्येकी १ हे. जमीनीची कायदेशिर मालकी व वहिवाट वादींच्या नावे घोषित करण्याबाबत व निरंतर मनाई हुकुमाच्या अनुतोषाकरीता दाखल केला आहे.

०७. सदर दाव्यातील दावा मिळकत हि मौजे तांदुळवाडी ता. भोकरदन जि. जालना येथील गायरान शेत जमीन गट क्र. १०३ हि आहे. सदर अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे अर्जदार क्र.१ ते १४ हे मौजे मंडप

सिरसगाव ता. भोकरदन जि. जालना येथील गायरान शेत जमीन गट क्र. १७७ मधील प्रत्येकी ३ एकर जमीनीचे सन १९८१ पासुन ताबेदार आहेत.

०८. थोडक्यात, सदर दाव्यामध्ये नमुद दावा मिळकत मौजे तांदुळवाडी ता भोकरदन जि. जालना येथील गायरान शेत जमीन गट क्र.१०३ असुन सदर अर्जामध्ये नमुद दावा मिळकत मौजे मंडप सिरसगाव ता भोकरदन जि. जालना येथील गायरान शेत जमीन गट क्र. १७७ हि आहे. दोन्ही मिळकती भिन्न आहेत. अर्जदार यांचा गट क्र. १०३ या दाव्यातील जमीनीमध्ये कोणताही हक्क हितसंबंध नाही असे दिसुन येते. त्यामुळे वादीने मागितलेल्या अनुतोषामध्ये सदर अर्जदारांना मंडप सिरसगाव ता. भोकदरन जि. जालना येथील गट क्र. १७७ बद्दल अनुतोष मागता येणार नाही. अर्जदार हे गट क्र. १७७ या गायरान जमीनीबाबत स्वतंत्र रित्या अनुतोष मागु शकतात. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

०१. निशाणी २२ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

०२. अर्जाचा खर्च पक्षकारांनी आपापला सोसावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DIPALI MANOHAR SHINDE
Date: 2024.04.25 11:16:21 +0530

(**श्रीमती डि. एम. शिंदे**)

दिनांकः– २२.०४.२०२४

४ थे सह दिवाणी न्यायाधीश,
(व. स्तर), जालना.

**नि. दि. दावा ७५/२०२१**
**सुखदेव व ईतर वि.शासन**
**CNRNO.MHJN020003812021**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी. डी. एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : ए. एस. जोशी
न्यायालयाचे नांव : ४ थे सह दिवाणी न्यायालय, (व.स्तर) जालना.
निकाल दिनांक : २२.०४.२०२४

स्वा/-
(ए. एस. जोशी)
लघुलेखक